**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांक: 16.06.2024** **वार: रविवार**

---

**ठळक बातम्या**

**1. पीएम-किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत २० हजार कोटी रुपयांचं मंगळवारी वितरण.**

**2. येत्या 5 वर्षांत इलेक्ट्रॉनिक उत्पादन क्षेत्रात, 50 लाख नोकऱ्या देण्याचं सरकारचं उद्दीष्ट.**

**3. १८व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार सुब्बय्या नल्लमुत्थू यांना प्रदान.**

**4. भारत सासणे आणि देविदास सौदागर यांना युवा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर.**

**आणि**

**5. ब्रिक्स स्पर्धांमध्ये भारतीय महिला टेबल टेनिस संघाला कास्य पदक.**

**किसान-हप्ता**

पंतप्रधान नरेंद्र मोदी **18** जून रोजी वाराणसीमध्ये पीएम-किसान सन्मान निधी योजनेंतर्गत **9** कोटी **3** लाख शेतकऱ्यांच्या खात्यात, **20** हजार कोटी रुपये हस्तांतरित करणार आहेत. कृषी आणि शेतकरी कल्याण तसंच केंद्रीय ग्राम विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. गेल्या **10** वर्षांत **11** कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात **3** लाख कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत, असं चौहान म्हणाले. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी सर्व मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवली आहेत. ग्रामविकास आणि कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर चौहान यांनी मंत्रालयातील अधिकाऱ्यांशी चर्चा करून शेतकऱ्यांच्या हिताशी संबंधित प्रत्येक महत्त्वाच्या मुद्द्यावर काम सुरू केलं आहे.

**नोकऱ्या**

येत्या **5** वर्षांत इलेक्ट्रॉनिक उत्पादन क्षेत्रात **50** लाख नोकऱ्या देण्याचं सरकारचं उद्दीष्ट आहे. सध्या **25** लाख लोक इलेक्ट्रॉनिक उत्पादन क्षेत्रात कार्यरत असून ही संख्या दुप्पट करण्याचा केंद्र सरकारचा मानस आहे असं अधिकृत सूत्रांनी म्हटलं आहे. सध्या **130** अब्ज डॉलर उलाढाल असलेल्या भारताच्या इलेक्ट्रॉनिक उत्पादन क्षेत्रात, पुढील **5** वर्षांत दुपटीनं वाढ होण्याची शक्यता आहे. या क्षेत्रात देशाला स्वावलंबी बनविण्यावर आणि एक प्रमुख इलेक्ट्रॉनिक उत्पादन केंद्र बनविण्यावर केंद्र सरकार विशेष लक्ष देत आहे.

**नवीकरणीय**

भारतीय पवन ऊर्जा क्षेत्राचं यश साजरं करण्यासाठी, नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने काल नवी दिल्ली इथे 'वैश्विक पवन दिन' आयोजित केला. यावेळी अक्षय उर्जेची उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि पवन ऊर्जेमध्ये आघाडी मिळवण्यासाठी सामूहिक कृती आवश्यक असल्याचं नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद येसो नाईक यांनी सांगितलं. देशातील पवन ऊर्जेच्या सर्वाधिक क्षमता वाढीसाठी **2023-24** या आर्थिक वर्षात गुजरात, कर्नाटक आणि तामिळनाडू राज्यांना केंद्रानं मदत दिल्याची माहिती नाईक यांनी दिली. अधिक विश्वासार्ह वीजवहनासाठी आणि **2030** पर्यंत **500** गिगावॅट अक्षय ऊर्जा क्षमता; आणि **2070**पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जन याकरता; सौर आणि पवन ऊर्जेच्या संयोजनावर भर देणार असल्याचं मंत्रालयाचे सचिव, भूपिंदर सिंग भल्ला यांनी सांगितलं.

**क्वांटम-स्टार्टप्स**

भारतानं **2** वर्षांत जागतिक क्षमता असलेल्या स्टार्ट अपसह ४० हून अधिक क्वांटम टेक्नॉलॉजी स्टार्ट-अप्सची निर्मिती केल्याचं माहिती केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी म्हटलं आहे. काल नवी दिल्ली इथं विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या आढावा बैठकीत अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. प्रमुख राष्ट्रीय क्वांटम मिशनवर लक्ष केंद्रित करण्याचे आणि क्वांटम तंत्रज्ञान आणि क्वांटम दूरसंचार विकासावर काम करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. गेल्या **10** वर्षांत बाह्य संशोधन आणि विकासामध्ये महिलांचा सहभाग दुपटीनं वाढल्याबद्दल डॉ. सिंग यांनी कौतुक केलं.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण विविधभारतीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात**

**मिफ पुरस्कार**

१८व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन काल माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन, राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि मान्यवरांच्या उपस्थितीत झालं. यावेळी व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार प्रसिद्ध वन्यजीव चित्रपट निर्माते सुब्बय्या नल्लमुत्थू यांना प्रदान करण्यात आला. या महोत्सवाची सुरुवात बिली अँड मॉली – ॲन ऑटर लव्ह स्टोरी या माहितीपटाने झाली.

भारतीय चित्रपटक्षेत्राच्या वाढीसाठी सरकार वचनबद्ध आहे. माहितीपट, लघुपट, ॲनिमेशनपट निर्मात्यांनी भारतात येऊन चित्रीकरण करावं, असं आवाहन एल. मुरुगन यांनी यावेळी केलं. महोत्सवाच्या औपचारिक उद्घाटन सोहळ्याला अभिनेता रणदीप हुडा, अभिनेत्री दिव्या दत्ता, ज्येष्ठ निर्माते किरण शांताराम यांच्यासह देशविदेशातले अनेक मान्यवरही उपस्थित होते.

**साहित्य-अकादमी**

ज्येष्ठ कथाकार आणि माजी संमेलनाध्यक्ष भारत सासणे यांच्या 'समशेर आणि भुतबंगला' या बाल कादंबरीला तसंच तुळजापूर इथले लेखक देविदास सौदागर यांच्या 'उसवण' या

कादंबरीला सन **2024** चा युवा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. साहित्य क्षेत्रातील अत्यंत मानाच्या अशा साहित्य अकादमीच्या **2024** च्या पुरस्कारांची घोषणा साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत करण्यात आली. यामध्ये मराठी आणि नेपाळीसह **24** भाषांमधले बालसाहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आले. रोख **50** हजार रुपये आणि सन्मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

## रेल्वेलिम्का

भारतीय रेल्वेची लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. विविध ठिकाणी सार्वजनिक सेवा कार्यक्रमात अधिकाधिक लोकांच्या सहभागासाठी ही नोंद झाली आहे. रेल्वेने २६ फेब्रुवारी रोजी विविध दोन हजार स्थळांवर कार्यक्रमाचे आयोजन केले होते त्यामध्ये ४० लाख १९ हजार लोकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते, रेल्वे पुलांवरून रस्त्यांचे उद्घाटन तसंच नव्या रेल्वेस्थानाची पायाभरणी करण्यात आली होती.

## वंदे भारत शयन

वंदे भारत रेल्वे गाड्यांमध्ये पुढील दोन महिन्यात शयनयान कक्षाची चाचणी सुरू होईल अशी माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत दिली. सध्या वंदेभारत मध्ये केवळ खुर्चीयान उपलब्ध आहे. वंदेभारतमध्ये शयनयानाची मागणी प्रवाशांकडून होत असल्याचं वैष्णव म्हणाले. गेल्या दहा वर्षात ३५ हजार किलोमीटर रेल्वेमार्गाचं जाळं निर्माण करण्यात आलं असून निम्न उत्पन्न गटाच्या प्रवाशांनाही आरामदायी प्रवास-सोयी उपलब्ध करुन देण्याकडे आपण लक्ष देत असल्याचं त्यांनी सांगितलं. अमृत भारत रेल्वेच्या उत्पादनवाढीचं काम वेगात सुरु असल्याची माहितीही वैष्णव यांनी यावेळी दिली.

## सिक्किम बचाव

सिक्किममध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि दरड कोसळल्याने अडकलेल्या बाराशे पर्यटकांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरु असून, मंत्री शेरिंग भुतिया स्वतः रस्ते आणि हवाई मार्गाने पर्यटकांच्या बचावकार्यावर लक्ष ठेवून आहेत. जिल्हाधिकारी हेमकुमार छेत्री यांच्या नेतृत्वाखाली विविध विभाग तसंच लोकांच्या मदतीने स्थानिक बचाव आणि पुनर्विकास काम सुरू आहे. मुख्यमंत्री प्रेसिंग तमांग यांनी मेल्लीबाजारला भेट देऊन पुरामुळे झालेल्या नुकसानाचा आढावा घेतला. तसंच पाटबंधारे विभागाशी प्रतिबंधात्मक उपायांबाबत चर्चाही केली. पावसाळ्यानंतर कायमस्वरुपी पूरनियंत्रण भिंत बांधणार असल्याचे पाटबंधारे विभागाने सांगितलं आहे. सिक्किममधले रस्ते आणि पूल विभाग आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय यांच्यादरम्या काल झालेल्या एका उच्चस्तरीय बैठकीत, राष्ट्रीय महामार्ग दहावर येणाऱ्या अडथळ्यांविषयी चर्चा करण्यात आली.

**काझीरंगा मुख्यमंत्री**

आसाममध्ये पावसाळ्यात येणाऱ्या पुराच्या पार्श्वभुमीवर, राज्याचे मुख्यमंत्री हेमंत विश्वशर्मा यांनी काल काझीरंगा अभयारण्यातल्या प्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासकीय आणि पोलिस व्यवस्थापनाची बैठक घेतली. कांझीरंगा इथं प्राण्यांच्या सुरक्षेसाठी **3** नवीन कमांडो तुकड्या तैनात करण्यात आल्या असून, पूरपरिस्थितीत कांझीरंगाच्या नव्या तुकडीतील ६०० जवान सुरक्षितितेसाठी पाठवण्यात येतील असं बैठकीनंतर बोलताना मुख्यमंत्री सर्मा यांनी सांगितलं.

**लडाख हेमिस**

लडाखमध्ये वार्षिक हेमिस मोनास्टिक उत्सव म्हणजे हेमिस त्सेचु ला आजपासून पारंपरिक पद्धतीने सुरुवात होत आहे. गुरु पद्मसंभव यांच्या जयंतीनिमित्ताने साजरा होणाऱ्या या उत्सवात प्रार्थनांचे आयोजन तसंच मुखवटे घालून नृत्य तसंच थांका किंवा म्युरल पेटिंग्स चे प्रदर्शनही आयोजन केले जाते. परदेशासह अनेक लोक या उत्सवासाठी लडाखमध्ये दाखल होतात. १७ व्या शतकापासून हा उत्सव साजरा केला जातो आहे.

**उष्णतेची लाट**

देशात पंजाब, हरयाणा, झारखंड, बिहार, उत्तर प्रदेश आणि दिल्ली या राज्यात उष्णतेची लाट कायम राहणार असून या राज्यांना लाल बावटा जारी केला आहे. पश्चिम बंगाल आणि ओडिशालाही केशरी बावटा देण्यात आला आहे. काल दिल्लीत ४४ पूर्णांक ६ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. सध्या रात्रीच्या वाढत्या तापमानाचा दैनंदिन जीवनावर परिणाम होण्याची शक्यता असून, गेल्या दहा वर्षांच्या तुलनेत यंदा उष्ण दिवसांचं प्रमाण जास्त असल्याचं हवामान खात्याचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ आर. के जेनामनी यांनी आकाशवाणीला सांगितलं.

**ब्रिक्स**

रशियात सुरु असलेल्या ब्रिक्स क्रीडा स्पर्धांमध्ये भारताने टेबल टेनिस क्रीडा प्रकारात कास्य पदक मिळवत आपले पदकांचे खाते उघडले. पोयमंती बैश्य, मौमिता दत्ता आणि यशिनी शिवशंकर यांच्या संघाला चीनच्या संघाकडून पराभव पत्करावा लागला असला तरीही भारताच्या नावावर पहिले पदक जमा झाले. नवनिर्वाचित क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी संघाचे अभिनंदन केले आहे. पुरूष संघाला पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**